## ( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

क्र: पोमसं /८अ/नि.सू -२०१६-१७(प्र.लि. ते का.अ.)/मफुसल/ २२६/२०१६ मुंबई , दिनांक : ०१ /०८/२०१७

## -: आदेश :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील खालील नमूद प्रमुख लिपीक (अराजपत्रित गट क ) यांना कार्यालय अधीक्षक (राजपत्रित / अराजपत्रित गट ब ) या पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नियुक्ती नागरी सेवा मंडळाच्या मान्यतेनुसार त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | प्रमुख लिपीकांचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नवीन नेमणूकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री सुभाष गुलाबराव झोड | विपोमनि, न.वि.अ., नागपूर | विपोमनि, रारापोबल, पुणे |

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई .

प्रति,

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

२. उपरोक्त प्रमुख लिपीक श्री सुभाष गुलाबराव झोड यांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता सविस्तर अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशांची वाट पाहावी.

३. उपरोक्त प्रमुख लिपीक श्री सुभाष गुलाबराव झोड यांच्याविरुध्द वरीलप्रमाणे काहीच कार्यवाही प्रलंबित नसेल तर त्यांना **पर्यायी प्रमुख लिपीकाची वाट न पाहता** पदोन्नतीवर नवीन नियुक्तीचे ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना कार्यमुक्त केल्याचा व पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक सत्वर ह्या कार्यालयास कळवावा.

४. घटक प्रमुखांनी संबंधित प्रमुख लिपीक श्री सुभाष गुलाबराव झोड यांना विनाविलंब कार्यमुक्त न केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित घटक प्रमुखांची राहील.

५. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएच्वाय् /१०८२/सीआर्/११००(२)/एसईआर् -३, दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

६. सदरहू आदेश मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक २७९७/२०१५ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

७. उपरोक्त प्रमुख लिपीक श्री सुभाष गुलाबराव झोड हे पदोन्नतीवर जाण्यास इच्छुक नसतील तर त्यांनी तसा **अर्ज ७ दिवसांचे आत** घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावा. तसा अर्ज त्यांनी सादर न केल्यास घटक प्रमुखांनी त्यांना **दिनांक ०४/०८/२०१७ रोजी** न चुकता कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

८. पदोन्नती आदेशानंतर जर प्रमुख लिपीक श्री सुभाष गुलाबराव झोड रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील तर त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती दल, म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० / १२
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष.

२. सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

**(अनुप कुमार सिंह )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.